सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाडिबीटी पोर्टलद्वारे कार्यान्वित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती वितरण प्रणालीद्वारे शैक्षणिक संस्था व अर्जदार विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती रक्कमेची अदायगी होण्यासाठी अनिवार्य असलेल्या Redeem Button सक्रीयकरणाची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्था व विद्यार्थी यांची असल्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग
आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : ईबीसी-२०१७/प्र.क्र.७३/शिक्षण
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०३ जुलै, २०१९

<u>वाचा :</u>- १) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचे शासन परिपत्रक क्र. ईबीसी-२०१७/ प्र.क्र.७३/ शिक्षण, दि.२४ मे, २०१९.
२) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र. विभशा-२०१८/ प्र.क्र.१३५/ शिक्षण, दि.१९ जून, २०१८.

प्रस्तावना:-

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून राज्य शासनाच्या महाडिबीटी प्रणालीद्वारे विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागातील शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत. आजमितीस एकूण ०८ योजना महाडिबीटी प्रणालीवर कार्यान्वित आहेत. सदर ०८ योजनांतर्गत शैक्षणिक संस्थांकडून संबंधित जिल्हयाच्या सहायक आयुक्तांच्या Login मध्ये प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी सहायक आयुक्त स्तरावर करण्यात येते. अर्जांच्या पडताळणीअंती प्राप्त अर्जांमध्ये काही त्रुटी असल्यास, असे अर्ज महाविद्यालयांकडे परत पाठविण्यात येतात, तर परिपूर्ण अर्ज अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कमेच्या अदायगीसाठी आवश्यक असलेल्या पुढील संस्करणासाठी forward करण्यात येतात. अंतिमत: संबंधित विद्यार्थी यांनी शिष्यवृत्ती अदायगीसाठी होण्यासाठी अनिवार्य असलेल्या Redeem Button चे सक्रीयकरण करणे आवश्यक असते. त्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज PFMS Portal वर पाठविता येत नाही. त्यामुळे पुढील सर्व प्रक्रिया ठप्प होऊन जाते. परंतू बरेच विद्यार्थी Redeem Button चे सक्रीयकरण करण्यामध्ये कालापव्यय करत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित विद्यार्थी तसेच शैक्षणिक संस्थांना अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण करण्यास विलंब होतो. संबंधित विद्यार्थी शिक्षण संस्थेमध्ये शिकत असल्याने संबंधित शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांशी संपर्क करुन Redeem Button वापरण्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधन आवश्यक आहे.

२. उक्त पार्श्वभूमीवर शैक्षणिक संस्थांना शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण वाजवी वेळेत होत नसल्यामुळे शैक्षणिक संस्था वाचा क्र.२ येथे नमूद दि.१९.६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्माण करुन दिलेल्या अर्धन्यायिक स्वरुपाच्या कार्यपध्दतीचा अवलंब न करता थेट मा.उच्च न्यायालयात प्रशासकीय

विभाग, संबंधित सहायक आयुक्त व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांच्याविरुध्द याचिका दाखल करतात. मा.उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण संबंधित शैक्षणिक संस्था व विद्यार्थी यांनी करावयाच्या कार्यवाहीमुळे जरी प्रलंबित असले तरी त्याचे दायित्व शासनाकडे दाखविण्यात येते. अशावेळी मा.उच्च न्यायालयासमोर शासनाची भूमिका मांडणे अडचणीचे ठरते. या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात येते आहे.

<u>शासन परिपत्रक</u> :-

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून पोर्टलद्वारे कार्यान्वित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती वितरण प्रणालीद्वारे शैक्षणिक संस्था व अर्जदार विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती रक्कमेची अदायगी होण्यासाठी अनिवार्य असलेल्या Redeem Button सक्रीय करण्याबाबत महाडिबीटी प्रणालीअंतर्गत SMS Generate होवून संबंधित विद्यार्थी यांनी प्रणालीवर नोंद केलेल्या भ्रमणध्वनीवर पाठविण्यात येतो. संबंधित शैक्षणिक संस्था यांनादेखील याबाबतची माहिती पोर्टलवर उपलब्ध होवू शकते. या पाश्वभूमीवर विद्यार्थ्यांना Redem Button सक्रीय करण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थांनी त्वरित सूचित करुन Redeem Button सक्रीय होईल याची दक्षता घ्यावी. भविष्यात Redeem Button सक्रीय न झाल्यामुळे शैक्षणिक संस्थांची शिष्यवृत्ती रक्कम प्रलंबित राहिल्यास त्याची जबाबदारी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची राहणार नाही. कारण विद्यार्थी त्याच शिक्षण संस्थेत शिकत असतो, दर दिवशी वर्गात उपस्थित राहतो त्यामुळे संबंधित शिक्षण संस्थांचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांशी संपर्क करुन Redeem Button वापरण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. जर विद्यार्थ्यांने Redeem Button वापरले नाही तर ती जबाबदारी शासनाची नसून संबंधित संस्था / विद्यार्थ्यांची आहे. Pool Account मध्ये निधी असतानासुध्दा Redeem Button न वापरल्यामुळे निधी पडून राहत असेल तर त्यामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी शासनाची राहणार नाही.

२. राज्यातील सर्व जिल्हयांच्या सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी सदर शासन परिपत्रक स्वतंत्र पत्राद्वारे त्यांच्या जिल्हयातील सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून सदर हा शासन परिपत्रक सर्व शैक्षणिक संस्थांना प्राप्त झाल्याबाबतची पोच कार्यालयीन अभिलेखात जतन करुन ठेवावी. भविष्यात एखादया संस्थेने प्रलंबित शिष्यवृत्ती रक्कमेबाबत मा.उच्च न्यायालयात दाद मागितल्यास व सदर प्रलंबित शिष्यवृत्ती Redem Button च्या सक्रीयीकरणाअभावी प्रलंबित असल्यास मा.न्यायालयात विभागाची भूमिका मांडण्यासाठी या अभिलेखांचा तपशील मा.उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात यावा. तसेच शासन निर्णय दि.१९.६.२०१८ प्रमाणे न्यायालयात जाण्यापूर्वी अर्धन्यायिक व्यवस्थेचा उपयोग करावा याबाबत सर्व संस्थांना लेखी कळवावे. जर अर्धन्यायिक व्यवस्थेचा उपयोग न करता शैक्षणिक संस्थांनी थेट न्यायालयात दाद मागितल्यास तातडीने मा.न्यायालयाच्या निदर्शनास दि.१९.६.२०१८ चा शासन निर्णय आणावा आणि पर्यायी व्यवस्था उपलब्ध असताना न्यायालयात जाणे योग्य नाही हे मा.न्यायालयाच्या निदर्शनास प्रथम शपथपत्राद्वारे आणावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०७०३१७५३५०९१२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.07.03 18:01:28 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व)
३. सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
४. सहायक आयुक्त, जिल्हा परिषद (सर्व)
५. जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व)
६. निवड नस्ती, कार्या- शिक्षण.